-५१-

०२३५२-२८५०० / २८२४०
लक्षवेध - डॉ. खंडसकर
अनुसूचित जमातीकरिता राखीव असलेल्या पदावर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांचे जमातीचे दाखले तपासणे.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शुद्धिपत्र क्रमांक : एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ मे, २००१

वाचा : १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१३९९/प.क्र.२/का.१०, दिनांक ९ सप्टेंबर, १९९९.
२) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/. का.१०,दि. १३ एप्रिल,२०००
३) परिपत्रक क्रमांक आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दिनांक १५ मार्च, २००१.
४) शुद्धिपत्र, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी - १३९९/ प्र.क्र.२/ का.१०, दिनांक २ मे, २००१

__शुद्धिपत्र__ :- प्रस्तावनेतील दिनांक १३.४.२००० च्या परिपत्रकातील परिच्छेद- १ मध्ये "शासकीय / निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, नगर पालिका, महानगरपालिका, बँका, शासकीय उपक्रम (उदा. एस.टी.महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ ) व राज्य शासन अंगीकृत संस्थांमध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव पदावर नियुक्ती झालेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे जातीचे दावे पडताळणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत" अशी तरतूद करण्यात आलेली आहे. सदर तरतूद खाली सुधारित केल्याप्रमाणे वाचावी-

"शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय उपक्रमे ( Undertaking ), सांविधानिक संस्था (Statutory Bodies), जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, मंडळे/महामंडळे, शासनाचे अंगीकृत व्यवसाय, अकृषी व कृषी विद्यापीठे, शासकीय शैक्षणिक संस्था (आश्रमशाळांसह ), अनुदानित शैक्षणिक संस्था (अनुदानित आश्रमशाळांसह ), सहकारी संस्था/सहकारी साखर कारखाने/सहकारी सूत गिरण्या/बँका/सहकारी बँका, सहाय्यक अनुदान मिळणाऱ्या शासनमान्य स्वेच्छा संस्था (Voluntary Agencies ) यांच्यासह अन्य ज्या ज्या प्रकारच्या संस्था व कार्यालये (This list is illustrative and not exhaustive) यांना शासनाच्या तिजोरीतून निधी/अनुदान/ सहाय्यक अनुदान मिळते अशा सर्वप्रकारच्या सेवांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदांवर अशोदरच नियुक्त झालेल्या आणि नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांचे जमातीचे प्रमाणपत्र संबंधित तपासणी समितीकडून तपासून घेण्यात यावेत. वरील सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ज्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी त्यांच्या पदोन्नतीच्या आधारावर झालेली नाही अशा सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. तसेच पदोन्नती देण्यात येणाऱ्या सर्व अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात यावी. त्याशिवाय त्यांना पदोन्नती देण्यात येऊ नये."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्यामला शुक्ला )
उप सचिव

जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे कार्यालय
संकलन - आस्थापना
आवक क्र.
6 JUN 2001
कार्य विवरण क्र. -

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव.
मुख्यमंत्री यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे सचिव.